REVIEW OF RESEARCH
ISSN: 2249-894X
IMPACT FACTOR : 5.2331(UIF)
VOLUME - 7 | ISSUE - 5 | FEBRUARY - 2018

# खानदेशातील ‘पारोळा’ येथील श्री बालाजी देवस्थानाचा ऐतिहासिक अभ्यास

**डॉ. रावसाहेब भिमराव नेरकर**
**इतिहास विभाग, राणी लक्ष्मीबाई महाविद्यालय, पारोळा , जि.जळगांव.**

**सारांश : -**

मंदीरे व धार्मिक स्थळे ही धर्म जागृतीची, संस्कृती जोपासनेची व संवर्धनाची साधने मानल्यास पारोळ्याच्या या भूमीस हा सांस्कृतिक वारसा फार मोठ्या प्रमाणात लाभला आहे असे म्हणावयास हरकत नाही. प्राचीन देवालये आणि विविध धर्मपंथीयांची श्रद्धास्थाने असलेल्या पारोळ्याचा परिसर महाराष्ट्रातील दूरवर विखुरलेल्या भाविकांचे मोठे आकर्षण होय. श्री बालाजी देवस्थान हे भक्तांच्या नवसाला पावणारे व त्यांचे मनोरथ पुर्ण करणारे आहे ही भाविकांची मोठी श्रद्धा आहे.

पारोळा शहराचे आराध्य दैवत “श्री बालाजी” देवस्थान सुमारे २५० वर्षापूर्वीचे आहे त्या काळात तीस हजार रूपये खर्च करून या मंदिराची उभारणी करण्यात आली होती. या मंदिराचा नुकताच म्हणजे इ.स. २०१७ मध्ये जिर्णोद्धार करण्यात आला. २ कोटी रूपये खर्च करून साऱ्या महाराष्ट्रातील भाविकांच्या सहभागाने अतिशय भव्य दिव्य, विलोभणीय अशी उभारणी करण्यात आली आहे. मंदिरासमोर भव्य असा गरूड खांब उभारण्यात आलेला आहे. मंदिराचे मुख्य प्रवेशद्वार भाविकांना खिळवून ठेवते. मंदिराच्या गाभाऱ्यात उच्च स्थानावर विराजमान झालेली ११ इंच उंची असलेली पंचधातुची श्री बालाजींची मूर्ती भाविकांचे डोळे दिपवून टाकणारी आहे. मंदिराला सोन्याचा मुलामा दिलेला भव्य कळस असून मंदिरावरील नक्षीकाम विलोभणीय असे आहे. या भव्य दिव्य मंदिराचे बांधकाम सतत सुरू होते राजस्थानी कारागिरांनी राजस्थानातून मागविलेल्या दगडामध्ये या मंदिराची उभारणी केली आहे.

## श्री. बालाजी देवस्थानाचे उत्सव :-

श्री. बालाजी महाराजांचा उत्सव मिती भाद्रपद वद्य १३ पासून सुरू होतो.

भाद्रपद वद्य पक्ष हा पितृपक्ष म्हणून गणला जातो त्या पितृ पक्षात कोणत्याही शुभ कार्याचे मुहूर्त नसून वरील दिवशी सुर्योदयाच्या वेळेस ब्रह्म मुहूर्त म्हणून उत्सवाच्या मंडपाच्या खाबांची मुहूर्त मेळ करण्यात येते तसेच भाद्रपद वद्य आमावस्थेस पंचाग कार्यांनी घटस्थापना व मातामह श्राद्ध पंचागात दाखविल्यास त्या दिवशी ‘ श्री ’ ची मिरवणूकीस सुरूवात होते.

१) आश्वीन शु।। प्रतिपदेस सकाळी ११ वाजेपर्यंत ब्राह्मणांच्या मंत्र घोषणांनी श्री चा अभिषेक नंतर आरती व प्रसादाचा लाभ सर्वांना मिळतो.

२) बालाजी संस्थानाचे ट्रस्ट आणि बालाजीची श्री ची निस्सीक सेवा करणारू सर्व मंडळी मंदीरात बसतात त्यांना श्री पुजारी प्रत्येकाच्या हाताला कंकण बांधतात सदरचे कंकण मी पंधरा दिवस पर्यंत बालाजीची सेवा करीन सदरचे कंकण बांधलेल्यांना पंधरा दिवस पर्यंत कधीच आजार किंवा आळस आलेली नसून मोठ्या जोमाने ते कार्य करीत असतात.



### १) ध्वजाचे वाहन-

चारचाकी गाडीवर सिंहासन ठेवून त्या सिंहासनावर श्रींची स्थापना करण्यात येते. समोर आजूबाजूस गरूड आणि हनुमंत ह्या दोन मित्रांचा समावेश असतो.आणि श्रींच्या डोक्यावर मोठी छत्री लावलेली असते.

सदरच्या वाहनांवर इलेक्ट्रीक रोषणाई केलेली असते व इलेक्ट्रीक मशीन गाडी वाहनाच्या मागे ठेवण्यांत येते. ठरविलेल्या वेळेस संध्याकाळी ६ वाजेस श्रींची मिरवणूकीस सुरूवात होते.

श्रींच्या प्रत्येक वाहनापुढे पालखी असते त्या पालखीत श्रींचीच पद्मावती लक्ष्मीसह

मुर्ती विराजमान होतात. सदर पालखी बरोबर बालाजी संस्थानाचे १ चोपदार १ बत्तीवाला २/४ हमाल पालखी खांद्यावर धरून ती पुढे चालत असते. वरील चोपदार यांना बालाजी संस्थान मार्फत ड्रेस चढविण्यांत येतो.

मिरवणूकीच्या पुढे वाद्ये, बँड, गुरव, डफवाले, लेझीम, तुतारी, भेरवाले वगैरे सर्व प्रकारच्या वाद्यांचा समावेश असतो.

वरील वाहनांस दोर लावून माणसाकडून ओढून नेतात वाहनाच्या गाडीच्या चारही चाकांना जवळ हमाल, पोलीस होमगार्ड असतात पुढे चोपदार असतात. अशा ह्या मोठ्या थाटांत श्री ची मिरवणूक सुरू होते. सर्व भाविक लोक आपल्या दाराशी श्रीचे वाहन आल्यावर आरती दाखवितात त्या आरतीत लोक पैसे देतात प्रसाद घेतात.

श्रींची आरती राम मंदीराकडूनच व्हावयास पाहिजे याचे वैशिष्ठ म्हणजे पुराणातील आधार- श्री रामचंद्र प्रभु हे लक्ष्मणाचे वडील भाऊ म्हणून ह्यांची भेट होत असते. अर्थात बालाजी अवतार म्हणजेच लक्ष्मण अवतार समजला जातो. म्हणूनच बंधू भेट करण्यांत येते. तेथून वाहन दक्षिणेकडे कासार गणपती मंदीरापर्यंत येऊन पुन्हा पश्चिमेस मारूती पर्यंत तेथून पुन्हा दक्षिणेस नाले गल्लीतून मंदीराजवळ येते सदर मिरवणूकीचे रात्री ९ ते १० सुमारांस विसर्जन होते नंतर श्रीनां वाहना वरून खाली उतरविण्यासाठी पंचारती करतात नंतर कापूराची आरती करतात नंतर श्री ची मूर्तीस ओक्षण करण्यात येते तदनंतर मंडपांत शुभ शोभित पाळण्यांत लाईटींग सहीत श्रीना बसविण्यांत येते मंडप सुद्धा खुप सुशोभीत केलेला असतो. ह्यांच मंडपात श्री. ह.भ.प. किर्तनकार बुवा यांचे किर्तन उत्तम प्रकारचे भक्तीरूप आख्यान लावून असंख्य स्त्री, पुरूष श्रवणाचा लाभ घेतात. सदरचे किर्तन लाऊड स्पिकरवर केले जाते. किर्तन आटोपल्यावर श्रीना मंदीरात सिंहासनावर विराजमान करण्यांत येते त्या वेळेस शेजाआरती होऊन पट बंद करण्यांत येतो त्या वेळेस देव झोपले अशी भावना समजली जाते. रोज नियमाप्रमाणे १५ दिवस सकाळी ४ वाजेस चौघडा वाजविण्यांत येतो व दुपारी १२ वाजेसही देवास नैवद्य दाखविण्याच्या वेळी चौघडा वाजविण्यांत येतो.

**२)** नागाचे वाहन- आश्वीन शु.२ चारचाकी गाडीवर नागाची वेटोळे घेतलेली व मोठ्या फणाधारी असलेली मुर्ती ठेवण्यांत येते सदर मुर्ती धरण्यांस २-३ हमाल लोक लागतात ह्या फणावर श्रीची स्थापना करण्यात येते त्याच्या आजुबाजुस २ नागकन्या असतात पुढे गरूड-हनुमंत हे हात जोडून उभे राहिले असतात.

आश्वीन शु।। २ वाहन मंदीरात आल्यावर रात्री १० वाजेस चित्रा नक्षत्र पाहून गरूड ध्वज पुजा करतात.

पुजेचे वैशिष्ठ- दोन मिटर केशरी रंगाच्या कापडावर चर्चा **गरूड आणि मारूती दोन्ही चित्र काढतात** त्यांत गरूडाचे चित्र मोकळे ठेवून मारूती चित्र असलेल्या भागांत ज्वारीचे पिवळे दाणे, हळदीने पांच- खांडे, ५ सुपाऱ्या, ५ खारका, ५ बदाम, १ श्रीफळ अशा वस्तू त्यांत टाकून एक पासोडी तयार करण्यात येते. ती पासोडी गरूडखांबाला पंचवीस फूट दोरी घेऊन बांधण्यात येते. सदर गरूड खांबाची पुजा मंदीराचे वंशज करतात. सदरची पूजा संन्याशी महाराजांच्या हस्ते करण्यांत येते त्या वेळेस आरती, प्रसाद वाटून सर्वांना पुजेचा लाभ येतो. ह्याही वेळेस स्त्री, पुरूषांची खूपच गर्दी असते.

आश्वीन शु. ३ (१) **मोराचे वाहन**

नेहमी प्रमाणेच त्या गाडीवर मोराची पिसारा फुललेली (चंद्राकृती आकाराची) मोठी मुर्ती बसविण्यात येते त्या मुर्तीवर श्रीची स्थापना व समोरच गरूड, हनुमंत हात जोन उभे राहिलेले वाहन त्या वेळेस सुरू होते त्या वेळेस मोर थुई थुई नाचत आहे असे दिसते.

आश्विन शु।। ३ **चंद्राचे वाहन**

नेहमी प्रमाणेच त्या चार चाकी गाडीवर हरणाची गाडी ठेवून त्यावर चंद्राची मूर्ती बसवितात व त्यावर श्रीची स्थापना करण्यांत येते व समोरच गरूड, हनुमान व हात जोडून उभे राहिलेले. मार्ग-वेळ-वरील पहिल्या वाहनाप्रमाणे रात्री किर्तनाचा कार्यक्रम

आश्विन शु।। **४ घोड्याचे वाहन**

नेहमी प्रमाणेच चार चाकी गाडीवर घोड्यास बसवून त्यावर श्रीची स्थापना समोरच गरूड, हनुमंत हात जोडून उभे असलेले मार्ग-वेळ- पहिल्या वाहना प्रमाणेच रात्री किर्तनाचा कार्यक्रम.

आश्विन शु।। **५ वाघाचे वाहन**

नेहमी प्रमाणेच त्या चार चाकी गाडीवर वाघाची मोठी मूर्ती ठेवून त्यावर श्रीची स्थापना व समोरच गरूड, हनुमंत हात जोडून उभे असलेले मार्ग- वरीलप्रमाणेच राममंदीराजवळ येवून पश्चिमेकडे वळवून मशीदीवरून कोष्टी गल्लीत येवून हिंगलाज मातेच्या मंदीरावरून पूर्वेकडे मारूती मंदीराजवळ येवून दक्षिणेस वळून नाले गल्लीत व तेथून मंदीराजवळ. **वेळ-** सदरचा मार्ग थोडा वाढल्यामुळे १ तास उशीरा वाहन येते. रात्री किर्तनाचा कार्यक्रम व किर्तनाचा शेवटचा दिवस.

आश्विन शु।। **६ कल्पवृक्षचे वाहन-**

सदरच्या वाहनावर कल्पवृक्षचे झाड फार सुशोभित कारागिराने केलेले आहे. झाडावर पोपट, वानर, साळुंखी, वगैरे बसविलेले आहे. कल्पवृक्षाच्या छायेखाली श्रीची स्थापना करण्यात येते. ज्याप्रमाणे गोवर्धन पर्वताच्याखाली भगवान पेंद्या, गाई, गोपी, सवंगड्यासह असतात त्याचप्रमाणे कल्पवृक्षाच्याखाली भगवान श्रीकृष्ण पेंद्या, गाई, गोपी सवंगडीसह आहेत.

आश्विन शु।। **७- श्री. मालक गिरी शेठ यांच्या भेटीस देव जातात**.

सकाळी आठ वाजता श्री ची पाळकीत विराजमान करून सदरची पालखी मालकाच्या (गिरी शेठ) भेटीसाठी छत्रीजवळ मालकांच्या पादुकेची पुजा अभिषेक होतो.

सदरची पालखी लाकडाची बनविलेली असुन तिचा उत्तम प्रकारचा पडदा असून दोन्ही बाजूस सिंहाचे चांदीची तोंडे लावण्यात येतात पालखी मोठी व वजनदार असल्यामुळे ४ ते ६ हमालांनी खांद्यावर धरून मिरवणूक काढतात.

आश्विन शु।। **७ हत्तीचे वाहन**

सदरच्या वाहनावर गजेंद्र हत्तीवर श्रीची स्थापना करण्यांत येते संतमेळा- श्रीच्या उजव्या बाजूस मालक श्री गिरी शेठ यांची मूर्ती त्यांच्या खांद्यावर श्रीची मूर्ती असलेली पडसी त्या पडसीत श्रीची मूर्ती सुशोभित दिसते. ह्या वरून मालक सोबत श्रीची मूर्ती पडसीत आल्याचा इतिहास प्रसिद्ध आहे. डाव्या बाजूस श्री संत शिरोमणी नामदेव महाराज, संत तुकाराम महाराज, संत नरसी मेहता, संत मिराबाई, संत चोखामेळा, संत सावता माळी, संत सेना न्हावी, संत नरहरी सोनार, संत ज्ञानेश्वर माऊली, श्री प्रल्हाद, श्री धृव, संत रामदास स्वामी, संत रोहिदास अहिल्या उद्धार संत कान्होपात्रा, संत जिव्हजी महाराज अशाप्रकारे संताचा समावेश असतो.

मार्ग- वरील वाहानाप्रमाणे कासार गणपती पर्यंत येवून मारोती मंदीराजवळ हिंगलाज मातेच्या मंदीरावरून लोंढे गल्लीतून, लवन गल्लीतून, कुंभार वाड्यावरून ओतारी गल्लीतून कापड बाजारांतून मंदीरात रात्री ९ वा. निघालेले वाहन सकाळी ४ ते ५ सुमारांस परत येते.

आश्विन शु. ८ **सूर्याचे वाहन**

सूर्याच्या रथाला सात घोडे व सारथी अरूण (गरूडाचा भाऊ) भगवान सूर्यनारायण व रथामध्ये उभे राहून त्यावर श्रीची स्थापना.

पहिल्या वाहनाप्रमाणे कासार गणपती मंदीरापर्यंत येऊन पूर्वेस बहिरम गल्लीतून गुजराथी गल्ली गणपती मंदीरावरून गावहोळी पर्यंत तेथून बाजारपेठ नगरपालिकेवरून माळी मढीपर्यंत व तेथून भील दरवाजावरून पाठक पुजारी यांचे घरावरून कुंभार वाड्यावरून लवन गल्लीत येऊ मंदीरात रात्री ९ वाजता निघून सकाळी ४ च्या सुमारास परत येते.

आश्विन शु।। ९ **मारूती वाहन**

सदरच्या वाहनांवर मारूतीच्या ६ फुटी भव्य मूर्तीवर श्रीं.ची स्थापना करण्यांत येते सदरचे वाहन २४, २५ फुट उंच असते. ह्यावर कपिलसेना

मंदिरातून निघुन कासार गणपती वरून राममंदीरात तेथून कोळी गल्लीतून बागवान गल्लीतून जैनांचे डिगंबरी मंदिरावरून आझाद चौक परत काझीच्या मशिदीवरून गुजराथी गणपतीवरून गावहोळी वरून सरळ कुंभारवाड्या वरून मंदिरात रात्री १० निघून सकाळी ५, ६ च्या सुमारास परत येते.

अश्विन शु।। १० **गरूडाचे वाहन**

सदरच्या वाहनावर गरूडाची ६ फूटी भव्य मूर्तीवर श्री ची स्थापना करण्यांत येते सदरचे वाहन २४, २५ फुट उंच असते. ह्या वाहनावर स्त्री राज्यातील स्त्रीयांचा नाच गाण्यासहित साज सरंज्याम सहित स्त्रीयांचा समावेश घेतलेला आहे. सदरच्या सर्व स्त्रीया निरनिराळ्या वेश व केश भुषण केलेल्या आहेत. वरील सर्व स्त्रीया सुंदर, मोहक पऱ्यांप्रमाणेच दिसतात.

आश्विन शु।। ११ एकादशी - **रथ**

सदरचा रथ हा महाराष्ट्रात प्रसिद्ध भव्य रथ आहे. रथावर उत्तम प्रकारचे कोरीव काम असून सदरचे काम यावलकर मिस्त्री यांनी केलेले आहे. सदरचे काम इतके मन लावून केले आहे की त्यावर भगवान विष्णूचे १० अवतार कोरून बसविलेले आहेत. अशा सुशोभित रथावर दोन राक्षसांच्या भव्य मूर्त्या (आजूबाजूस) बसविण्यांत येतात पुढे दोन मोठे उत्तम प्रकारचे घोडे व त्यावर अर्जुन

बसविण्यांत येतो. अशो ह्या रथांत मध्यभागी सिंहासनावर श्री. ची स्थापना करण्यांत येते. रथाचा कळस, निशाण आणि ऊस लावून सुशोभित करण्यांत येतो.रथाच्या चारही बाजूस केळीचे खांब व घड लावण्यांत येतात.

सदर रथाची महापुजा दुपारी १२ वाजता वंशजाच्या हस्ते करण्यांत येते रथाच्या चाकाखाली भग म्हणून कोहोळ व श्रीफळ ठेवण्यांत येते. सदरच्या रथास ४ मोठे लांब असे १०० ते २०० फुट दोर लावण्यांत येतात सदरचा दोर भाविक लोक श्रीच्या गर्जनाने आनंदाने ओढतात.

ह्या मिरवणूकीत हजारोंच्या संख्येने लोक हजर राहतात पोलीस, फौजदार, तहसिलदार वगैरे अधिकारी आपली कामगिरी अगदी चोख रितीने व प्रेमाने बजवितात रथावर केळी फेकण्याचा प्रघात पूर्वीपासून चालत आलेला आहे.

वैशिष्ठे- अनेक हमालांकडून मोगरीचे नेआण होऊन रथ थांबविण्यास मोगरींचा उपयोग करतात. सदर मोगऱ्या ओल्या चिंचेच्या झाडाच्या लाकडाचे तयार करतात रथास साधारण ४०, ४५ मोगऱ्या लागतात. मिरवणूक संपल्यावर एकही मोगरी कामांत येत नाही. मोगरी लावणारे हमाल या गावातील २/२ पहिलवान अगदी रताच्या चाकामध्ये राहून बरोबर मोगऱ्या लावतात. हे काम भिलाभाऊ साळी, भिमाभाऊ सोनार इत्यादी कौशल्याने करतात. रथाचे चाक एवढे अवाढव्य आहे की माणूस सापडल्यावर मोगरी प्रमाणेच त्याचा चुरा हाऊन जाईल परंतू श्रींच्या कृपेने अजून पर्यंत काहीच असा प्रकार झाला नाही. हा रथ ओढण्यास साधारण २०० ते ३०० माणसे लागतात पण गावातील व यात्रेस येणारे लोक मोठ्या प्रमाणे रथ श्रींची गर्जना करत ओढीत असतात. रथाची मिरवणूक साधरण १ किलो मिटर लांब असते.

अश्विन शु।। १२ **अंगद**

सदरच्या वाहनावर अंगदाची भव्य मूर्ती (६ फुट उंचीची) असून सदरचे वाहन २४/२५ फुट उंच असून त्यावर छत्री असते. ह्या अंगदावर श्रींची स्थापना होते. अंगद हा वालीपुत्र असून हा किस्कींद देशाचा राजा होता त्या ठिकाणी भगवान रामचंद्र प्रभु वनवासांत गेले असतांना सिता मुक्तीच्या कामी अंगदाने रावणाकडे शिष्टाई केलेली हा संदर्भ रामयणांत आहे.

सदरच्या वाहनावर लंकेतील देखावा आहे.

दोन राक्षस डाव्या व उजव्या बाजूस- रामपंचायत राम, लक्ष्मण, भरत, शत्रुघ्न, सितासहीत शिवाय वानर सेना संपातीसह नळवानर सहित.

वैशिष्ठ्य- परत आल्यावर पंचाआरती होते व कापुराच्या अनेक आरत्या होऊन सुद्धा श्रींची मूर्ती वाहनावरून हलत नाही ह्या वेळेस पुजारी श्रींच्या मूर्तीस मोठ्या प्रेमाने हलवितो. कापुराची आरती कमीतकमी ४० ते ५० संख्येने होऊन मूर्तीचे वजन कमी होऊन मग पुजारी श्रींना वाहनाच्या खाली उतरवितात त्यावेळेस दर्शना करिता हजारो लोकांची गर्दी असते म्हणून पुजारी श्रींच्या मूर्तीस डोक्यावर धरून फार मोठ्या प्रयत्नाने मंदीराच्या पायरीजवळ येतात त्यावेळेस पुजारीसह मूर्तीस औक्षण करण्यांत येते. नंतर मूर्ती मंदीरात सिंहासनावर विराजमान होते.

अश्विन शु।। **१३ इंद्रसभा-**

सदरच्या वाहनावर इंद्राची भव्य मूर्ती बसविण्यात येते सदरची मूर्ती ५, ६ हमाल लावून उचलतात. सदरचे वाहन २०, २५ फूट उंच असून त्यावर छत्री असते, इंद्रावर श्रींची स्थापना होते.

उजवे व डावे बाजूस काळ भैरव इंद्राच्या मांडीजवळ त्यांचे चिरंजीव जयंत यांची लहान सुंदर गोजर मूर्ती, समोर गजाननाची मूर्ती, ब्रम्हा, विष्णू, महेश, चंद्र, सूर्य, अग्नी, पवन, वरूण, नारद, गायन करणारे तुंबर, चोपदार, विशिष्ठ, विश्वामित्र, सूर्य सारखी अरूण, काळ भैरव प्रतिनिधी. पुढे उर्वशी, रंभेचा नाच सारंगी तबला सह गंधर्व कामधेनु ऐरावत, अस्या रत्ने व देवविकांन सहित इंद्रसभा मोठ्या लाईटाने सुशोभित करण्यात येते.

आश्विन शु।। **१५ पालखी -**

पालखी सकाळ निघून राम मंदीरात १० वाजेस राम मंदीरात पोहचते तिथे श्रींचे स्नान विहीरीत उतरून सचैल-स्नान होते. नंतर अभिषेक, महापुजा व आरती प्रसाद.

मंदीरातून सकाळी ८ वाजेस निघून कापड बाजार गांव होळी वरून गुजराथी गणपती वरून मडके मारूतीपर्यंत जाते. तिथे आरती होऊन उत्तरेस आझाद चौकावरून डिगंबर मंदीरावरून बहिरम गल्लीतून कासार गणपती वरून राम मदीरात दुपारी १० वाजेस पोहचते. तिथे दुपारी पंचासह, कर्मचाऱ्यांना प्रसादाचा कार्यक्रम नंतर रात्री ८ वाजतां राम मंदीरातून निघून कासार गल्लीतील गणपती मंदीरावरून, बहिरम गल्लीतून गुजराथी गल्लीच्या गणपतीकडे गुजराथी गल्लीतून गांवहोळी, कापड बाजारातून मंदीरात परत रात्री १० वाजतां व ह्याच रात्री कोजागीराचा कार्यक्रम होतो.

**संदर्भ साधने -**


१) चौधरी कि.का. (संपादक) महाराष्ट्र राज्य गॅझेटीयर, महाराष्ट्र शासन मुंबई (मराठी आवृत्ती सुधारीत १९९४)

२) सोनवणे पी. आर. (प्रकाशक), स्मरणिका, पारोळा नगरपालिका शताब्दी महोत्सव, १९७२

३) पाटील (डॉ) भी. ना. (प्राचार्य) खानदेशातील समाज प्रबोधनाची चळवळ (१९००-१९५०)

४) भनसाळी डी. एम., सुंयुक्त खानदेश डिरेक्टरी (१९२२)

५) दैनिक गावकरी, २८ फ्रेबुवारी २००६ (पारोळा तालुका विकास पुरवणी)

६) दैनिक लोकमत, २८ एप्रिल २००७ (अमळनेर कार्यालय वर्धापन दिन विशेष)